| | |
|---|---|
| MHKO200001432022 | **नियमीत दिवाणी दावा क्रं. ४२/२०२२ मधील नि. ३४ खाली आदेश**<br><br>**श्री.मानसिंग आनंदा पाटील विरुध्द श्री.सौ.सावित्री उर्फ अनुसया गुंडू कापसे वगैरे** |

**०१.** प्रस्तुत दावा वादीने हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केला आहे.

**०२.** वादी यांनी सदरचा अर्ज सदर दाव्यातील प्रतिवादी नं. १ सावित्री उर्फ अनुसया गुंडू कापसे या दि. २६.०७.२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. तसचे त्यांचा मुलगा निवृत्ती गुंडा कापसे हा पूर्वीच म्हणजेच दि.१५.०२.२०२१ इ. रोजी मयत झाला आहे व मुलगी कमल मारुती जाधव ही दि. ०२.१२.२००९ इ.रोजी मयत झाली आहेत. प्रतिवादी क्रं.१ यांचे अर्जात नमुद केले प्रमाणे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** सदरचा विलंब हा प्रतिवादी क्रं. १ चे वारस रेकॉर्डवर घेणकरीता विलंब हा पुर्वीच्या वकिलांचेकडून कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने करता आली नाही तसेच वादींना कायदयाविषयी माहिती नसलयाने त्यांना इतर वारस रेकॉर्डवर घेणेबाबत कोणतीही कल्पना नसल्याने सदर प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झाला आहे. सदर विलंब माफ होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सदर वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ न झालेस वादीचे कधीही भरुन न येणारे असे नुकसान होणार आहे. यालउट विलंब माफ केलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

**०४.** प्रतिवादी क्रं.१–अ ते १–ड यांनी त्यांचे म्हणणे मुदतीत न दाखल केल्यामुळे त्यांचे विरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारित करण्यात आला. प्रतिवादी क्रं. २ व ३ यांनी त्यांचे लेखी म्हणणे सदर अर्जाच्या पाठीमागे दाखल केले असून त्यांनी असे कथन केले आहे की, प्रवितादी क्रं. १ यांनी प्रतिवादी क्रं. २ व ३ यांना दाव्यातील मिळकती बक्षीस पत्राने दिल्या आहेत. त्यामुळे दाव्यातील मिळकतीमध्ये

अन्य सारसांचा कोणताही संबंध राहिलेला नाही. तसचे प्रतिवादी क्रं. १चे वारस रेकॉर्डवर घेण्यास ११ महिने १७ दिवसाचा विलंब झाला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा. अर्ज मंजूर करणेचा झालेस वादी यांना कॉस्ट करण्यात यावी अशी विनंती केली आहे. तर नियोजीत प्रतिवादी क्रं.१–इ यांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जाच्या पाठीमागे दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्रं. १ सावित्री उर्फ अनुसया गुंडू कापसे यांनी प्रतिवादी क्रं. २ व ३ यांना दाव्यातील मिळकती बक्षीसपत्राने दिलेल्या आहेत. त्यामुळे दाव्यातील मिळकतीमध्ये नियोजीत प्रतिवादी नं. १–इ यांचा कोणताही संबंध राहिलेला नाही. त्यामुळे नियोजीत प्रतिवादी क्रं.१–इ यांना पक्षकार करणेची आवश्यकता नाही. त्यामुळे वादी यांचा सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०५.** वादीचा युक्तीवाद ऐकला. वादी यांचा विलंब माफी अर्ज (नि.३२), अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज (नि.क्रं.३३) मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे अर्जाच्या अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश.**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. वादी यांनी मुळ दाव्याच्या अनुषंगाने मयत प्रतिवादी क्रं. १ च्या वारसा बाबत पुढील तारखेस न चुकता दुरुस्ती करावी.

VAISHALI AMOL LAVAND-KOKATE

Digitally signed by VAISHALI AMOL LAVAND-KOKATE
Date: 2025.04.19 17:25:06 +0530

दि.१९.०४.२०२५.
कळे–खेरीवडे.

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळे–खेरीवडे.